पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/ ४ / कावि / १२ /२०१८
दिनांक : २८/०२/२०१८

प्रति,

मा. ---- --------------- -

सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा **सोमवार दि. ५/३/२०१८** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ५/३/२०१८ रोजी सकाळी ११.००** वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक ९**

**दिनांक: ५/३/२०१८** वेळ: **सकाळी ११.०० वाजता**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ५/३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दि. ५/२/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र. ७ )व दिनांक १४/२/२०१८ चे विशेष सभेचा सभावृत्तांत( कार्यक्रम पत्रिका क्र.८ ) कायम करणे.

विषय क्रमांक – १) मा.उषा वाघेरे यांनी दिनांक ३/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार पिंपरी वाघेरे येथील जलतरण तलावास " श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - २) मा.चंद्रकांत नखाते यांनी दिनांक १३/२/२०१८ रोजी दिलेल्या पत्रानुसार गाव मौजे रहाटणी येथील प्राथमिक शाळा क्र.५५ येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयासमोरील चौकास अद्याप काही नाव देण्यात आलेले नाही. सदर चौकाचा परिसर हा रहाटणी भागातील सर्व नागरिकांना ठाऊक आहे, परंतु एखाद्या नवीन व्यक्तिस पत्ता सांगावयाचा झाल्यास नागरिकांना तो भाग लवकर लक्षात येत नाही. याकरीता सदर शाळेलगत श्री छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा असल्याने नागरिकांच्या इच्छेनुसार सदर चौकास श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामांकन करण्यात यावे, सदर विषय कायम होण्याची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
गक्षेका /४/ कावि/१२ /२०१८
दिनांक : २८ /०२/२०१८